|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON– 425001

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/५/ सलग्नीत महा.प्रस्ताव-२०१८.१९/४९९/२०१७ दि. २०/०९/२०१७

## परिपत्रक

## नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी इच्छुक असलेल्या विविध शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य,
मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा.संचालक आणि नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी इच्छुक असलेल्या विविध शैक्षणिक संस्थाचे मा.अध्यक्ष/संचालक मंडळ...

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता कौशल्य विकास महाविद्यालये सुरु करण्याचे प्रस्ताव सादर न करणेबाबत..

**संदर्भ :-** ०१) विद्यापीठाचे जाहिर आवाहन जा.क्र.उमवि/०५/संलग्नता/सुधारीत बृहत आराखडा २०१८-१९ ते २०१९-२०/४८०/२०१७ दि. १८/०९/२०१७

०२)विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.उमवि/०५/संलग्नीत महा.प्रस्ताव-२०१८.१९/४९६/२०१७ दि. १८/०९/२०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या जाहिर आवाहनानुसार विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० करीता ०२ वर्षाच्या कालावधीसाठी नवीन महाविद्यालयांकरीता तयार केलेला सुधारीत बृहत आराखडा (भाग-१) आणि अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांकरीता विस्ताराच्या प्रस्तांवाच्या बाबतीत बृहत आराखडा (भाग-) २ च्या अनुषंगाने वरील संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकान्वये नवीन महाविद्यालये/विस्ताराचे प्रस्ताव सादर करण्यासाठी आवश्यक ती माहिती आणि वेळापत्रक जाहिर करण्यात आले होते. उपरोक्त बृहत आराखडयामध्ये आणि परिपत्रकामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता कौशल्य विकास महाविद्यालयांचे प्रस्ताव सादर करणेबाबत देखील सूचित करण्यात आले होते. तथापि, शासनाकडून अद्यापपावेतो कौशल्य विकास महाविद्यालयांसाठी आवश्यक ते निकष प्राप्त झालेले नसल्यामुळे कौशल्य विकास महविद्यालयांच्या प्रस्तावांवर सद्यस्थितीत कार्यवाही करणे संयुक्तिक होणार नाही. त्यामुळे शासनाकडून कौशल्य विकास महाविद्यालयांसाठी आवश्यक ते निकष प्राप्त होईपावेतो, कौशल्य विकास महाविद्यालयांचे प्रस्ताव स्विकारण्यात येवू नये असे आदेश प्राप्त झालेले आहेत.

वरीलनुसार कौशल्य विकास महाविद्यालयांसंदर्भात आवश्यक ते निकष प्राप्त झाल्यानंतर सदरची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येवून, त्याबाबतचे प्रस्ताव सादर करणे बाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळाव्दारे सूचित केले जाईल. त्यामुळे, ***सद्यस्थितीत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता कौशल्य विकास महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात येवू नयेत, ही नम्र विनंती.***

कळावे,

आपला विश्वासू,
Sd/-
(विशेष कार्य अधिकारी)
संलग्नता विभाग,
उ.म.वि.जळगाव